


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : ७२ वा | शनिवार दि. १९ एप्रिल २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# शल्यचिकित्सकानी केलेल्या प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश...

## जिल्हा उपसंचालकांच्या पत्राने आरोग्य विभागात खळबळ

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

जिल्हा शल्य चिकित्सक यांनी शासनाची मान्यता न घेता आपल्या स्तरावर आरोग्य विभागात केलेल्या प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश ११ एप्रिल २०२५ रोजी एका पत्राद्वारे दिले आहे. आरोग्य उपसंचालक यांच्या ह्या आदेशाने अमरावती विभागातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सकांच्या आदेशाला चपराक बसली असून प्रतिनियुक्त्याच्या माध्यमाने होणारी अर्थिक उलाढाल यापुढे करता येणार नसल्याने जिल्ह्यातील आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. दरम्यान आरोग्य अधिकारी यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत तक्रारी वरून आरोग्य सेवा उपसंचालक यांनी सदर आदेश पारित केले आहे.

जिल्ह्याच्या आरोग्य विभागात जिल्हा शल्य चिकित्सक हे महत्त्वाचे पद असून अलीकडील काळात जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांच्या सोयीनुसार प्रतिनियुक्त्या देण्यात आल्या होत्या. आरोग्य कर्मचारी अधिकारी यांच्या प्रतिनियुक्त्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्फत आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ता चंद्रकांत खरात यांनी विभागीय आयुक्त आणि आरोग्य उपसंचालक यांच्याकडे केली होती.आरोग्य विभागात गता अनेक वर्षापासून सुरू असलेल्या या गैरव्यवहाराच्या तक्रारीचा चंद्रकांत खरात यांनी पाठपुरावा केल्यानंतर विभागीय आयुक्त अमरावती यांनी दिलेल्या १२ डिसेंबर २०२४ रोजीच्या पत्रानुसार आरोग्य सेवा उपसंचालक डॉ कमलेश भंडारी यांनी नुकतेच ११ एप्रिल २०२५ रोजी जारी केलेल्या आदेशा नुसार सदर प्रतिनियुक्त्या शासनाची मान्यता न घेता केलेल्या असल्यामुळे तसेच सदर प्रतिनियुक्ती मध्ये गैरव्यवहार झाल्यामुळे चौकशी करण्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचा उल्लेख करण्यात आला असून यामध्ये सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या पत्राचा ही उल्लेख आहे. उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ यांनी एका आदेशानुसार अमरावती विभागातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक यांना त्यांच्या जिल्ह्यातील सर्व प्रतिनियुक्त्या विना विलंब रद्द करण्याचे आदेश दिले आहे. या आदेशामुळे आपल्या सोयीनुसार प्रतिनियुक्ती घेणाऱ्या जिल्ह्यातील सर्व आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य कर्मचारी अडचणीत सापडले असून लाखो रुपये मोजल्यानंतरही आपल्या सोयीनुसार प्रतिनियुक्ती नुसार आरोग्य सेवा देता येणार नाही. आरोग्य उपसंचालक यांच्या या आदेशामुळे




जिल्ह्यातील सर्व आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे.

✻ अमरावती विभागातील सर्वच जिल्ह्यात आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना त्यांच्या सोयीनुसार प्रति नियुक्ती देऊन आर्थिक गैरव्यवहार सुरू होते. प्रति नियुक्ती घेणारा आरोग्य अधिकारी यांची मूळ नियुक्ती असलेल्या ठिकाणाहून बदली झाली तरी आपल्या खाजगी दवाखान्याला वेळ देता यावी म्हणून आपल्या सोयीच्या ठिकाणी प्रतिनियुक्ती घेत होता. आरोग्य उपसंचालक यांच्या या आदेशाने आरोग्य विभागात होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहार संपुष्टात येणार आहे.

---

# गर्भपात रॅकेटचा भंडाफोड कारमध्येच होणार होत्या चाचण्या, मेहकरमध्ये मोठी कारवाई!

## अजून किती गुप्त डॉक्टरांची नावे येणार समोर?

**जनसंचलन/डोणगाव**

गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करत पथकाने गुरुवारी रात्री मेहकर तालुक्यात एक मोठी कारवाई केली. हिंगोली जिल्ह्यातील गजानन विठ्ठल वैद्य (३८, रा. माझोड, ता. सेनगाव) याला शेलगाव देशमुख शिवारात अटक केली. आरोपी महिलेला कारमध्ये घेऊन वाशीम जिल्ह्यातून मेहकर तालुक्यात येत होता, परंतु पथकाच्या पाठलागामुळे त्याला गजाआड करण्यात आले. गजानन वैद्य याने महिलेला डॉक्टर म्हणून ओळख दाखवली होती आणि गर्भपात करण्यासाठी २८ हजार रुपये घेतले होते. त्याने महिला फसवून, दुसरे डॉक्टर गर्भलिंग निदान करतील, मी गर्भपात करतो, असे सांगितले होते. पथकाने डमी महिला तयार करून सापळा रचला आणि आरोपीला पकडले. पोलिसांनी कारची झडती घेतल्यावर सेफ्टी ग्लोव्हज, ब्लड कलेक्शन बॉटल्स, सीरिंजसह वैद्यकीय साहित्य सापडले. डोणगाव पोलिसांनी डॉ. सुनीता हिवसे यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवला आहे. या रॅकेटच्या पाशांत मेहकरमधील काही डॉक्टरांचा सहभाग असण्याची शक्यता आहे आणि या प्रकरणाचा तपास सुरू आहे.



# एक आत्मिक डूब

## संपादकीय लेख

आपल्या वाट्याला अध्यात्माच्या सहवासात आत्मिक डूब येईल, असे त्या चेंडूला अजिबात वाटले नव्हते. चेंडूला असे काही वाटण्याचे तसे कारणही नाही. निर्जीव वस्तू. पण, सजीवांच्या संगतीने निर्जिवाच्या वाट्यालाही सजीवपण येते. हा तसा साधाच चेंडू. बाबांचे इकडे प्रवचन होते. तो कुठल्या तरी दुकानात एखाद्या शेल्फमध्ये असावा. की तो बाबांच्या टीमचाच सदस्य असावा. माहीत नाही. आता ही माहिती असून नसून काही उपयोगही नाही. आत्मिक डूब. ङ्गआपलाच ध्यास, आपल्याच पाशी. आपल्याच साठी मन मोठे...फ बाबा आध्यात्मिक जगतात प्रसिद्ध आहेत. त्यांचे लाखोंत फॅन आहेत. ते क्रिकेटचे फॅन आहेत. बागेत ङ्गधामधूम क्रिकेट खेळले जात असल्याच्या कथा भक्त सांगतात. बाबांची आवड ती भक्तांची आवड. असे हे बाबा प्रवचनाला आलेले. एक शिखर तो भेटावयास आलेला. दोन क्रिकेटवेडे एकत्र आल्यावर न का सामना रंगणार! चेंडू, फळी, त्रिफळा सज्ज करण्यात आला आहे. सारे अनौपचारिक आहे. तरीही सारे औपचारिक आहे. ऑडियन्सही रेडी आहे. सामन्याची वेळ झाली आहे. धुंद वातावरण आहे. बाबांनी सुरुवातीला गोलंदाजी स्वीकारली आहे. चेंडूला पहिला स्पर्श बाबांचा हे नियतीने ठरविले आहे. चेंडूला तोवर हे न ठाऊक. स्पर्शमहात्म्याची किंचितही जाणीव तोवर नसेलच या चेंडूला.

तो तोवर निर्विकार. त्रिफळा की फटका, काय आपल्या वाट्याला न जाणून तो. ङ्गआपल्याच आत, आपलेच घाव, आपल्याच हाती मलमही... अन् ती घटिका आली. बाबांच्या हाती चेंडू सज्ज झाला. तत्क्षणी चेंडूतल्या निर्जिवाला जणू सजीवाची सूक्ष्म अनुभूती आली. सूक्ष्मतेत मोठ्या साध्यतेची क्षमता असते लोकहो. चेंडू हातून सुटला. हवेच्या संपर्कात आला. हवेने चेंडूला हळूच कानात सांगितले, ङ्गतुझ्या वाट्याला येणार मोठा शॉट आहे...फ गोलंदाजाचे लक्ष्य त्रिफळा. चेंडू गोलंदाजाचे लक्ष्य वाहून नेत असतो. वाऱ्याने मात्र जे सांगितले, ते तर विपरीत. गोलंदाजाच्या नव्हे, फलंदाजाची बाजू घेणारे. म्हणून विपरीत. चेंडू पेचात पडला. आपण पार्टी बदलली की काय... भूमिका बदलली की काय... असे कसे... का व्हावे असे? प्रश्नांचा गोंधळ नुसता. हा गोंधळ मनात ठेऊन चेंडू फळीच्या संपर्कक्षेत्राच्या अगदी जवळ आला. आपल्याच हाती, आपलीच नाती, आपल्याच साठी, प्रपंच सारा... चेंडूच्या मनातला गोंधळ सरला नव्हता. आता त्याला कळू लागले होते. प्रत्येक पेच सोडविणे आपल्या हाती नाही. सामान्यांचा पेच सामान्य सोडवत नसतात. ती सोडविण्याची जबाबदारी आपण असामान्यांवर सोपविलेली असते. चेंडूला भान आले. हे भान स्पर्शातून आल्याची त्याला जाणीव झाली. तो शहारला. आता चेंडूने स्वत:ला सैल सोडून दिले. रित्या मनाने तो फळीवर आदळला. एका वेगळ्याच पातळीवर तो पोहोचला होता. ङ्गकुठे दूर जाते मन, मनाच्या आत गोंधळ इतका... ज्याच्या हाती फळी होती, त्याने मजबूत फटका लगावला. चेंडू



असा दूर गेला की उपस्थित सारे ओरडले, ङ्गसिक्सर... सिक्सर!फ षट्कार लागला होता. नामी माजी क्रिकेटपटूच तो. त्यानेही संधी सोडली नाही. षट्कार लागूनही बाबा आनंदले. खेळण्यात आनंद मोठा. बाबा जाणून होते. ङ्गअसते सारे माझे तुझेच, तुझ्याच साठी जीव गोळा.. आयपीएलमध्ये खेळणे या चेंडूच्या भाग्यात नव्हते. तितकी प्रतिभा त्याच्यात होती की नाही, कोण जाणे. आता हे सारे सवाल क्षुल्लक झाले होते. चेंडूलाही आता मर्म कळले होते. फलंदाजही आनंदाच्या ङ्गशिखराफ्वर होता. बाबांना भेटल्याने आनंदात होता. चारों ओर आनंदी आनंद होता. व्हिडीओ व्हायरल होता. आता चेंडू मनन आणि चिंतनाची एक अत्युच्च पातळी गाठण्याची क्षमता बाळगून आहे. आत्मिक उन्नतीचे महत्त्व त्याला पटले आहे.

---

## मच्छली ले-आउट येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**जनसंचलन/ बुलढाणा**

विश्वरत्न बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मच्छी ले-आउट येथील प्रांगणात अल्पसंख्यांक शिक्षण प्रशिक्षण बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली जयंती उत्सवाच्या आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष निलेश राऊत तर प्रमुख पाहुणे अमोल वाठोरे हे होते तर मंचावर संस्थेचे अध्यक्ष दीपक मोरे, वाठोरे साहेब उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम अध्यक्ष निलेश राऊत यांच्या हस्ते धम्म ध्वजाचा ध्वजारोहण करण्यात आलं त्यानंतर उपस्थित समाज बांधवांनि त्रिसरण पंचशील घेतले. संस्थेचे अध्यक्ष दीपक मोरे यांनी यावेळी मार्गदर्शन केले बाबासाहेबांनी शिका संघटित व्हा संघर्ष करा हा मुलमंत्र दिला सोबतच लोकशाहीची मूल्य दिली समता,स्वातंत्रता,बंधुता व न्याय संविधानाच्या माध्यमातून आपल्याला हे हक्क अधिकार दिला हे अधिकार व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वाचविण्यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागेल असे दीपक मोरे यांनी सांगितले

## बुलढाण्यातील जैन दीक्षा दोन जणांनी स्विकारली




**जनसंचलन/बुलढाणा**

ऐहिक सुख-सुविधांचा त्याग करून संयमाच्या मार्गावर वाटचाल करणे, संन्यासाच्या मार्गावर वाटचाल करणे सोपे काम नाही.. भौतिक इच्छांचा त्याग करून आत्म्याच्या मोक्षाचा मार्ग स्वीकारणारे आजच्या युगातही फार कमी लोक आहेत.. असाच एक दुर्मिळ देखावा आज बुलढाण्यामधील जिजामाता स्टेडियमवर पहायला मिळत आहे..येथे भडगाव येथील २४ वर्षीय तेजस कोचर आणि हिंगोना येथील २५ वर्षीय महिमा बोरा यांनी संयमाचे जीवन स्वीकारले आणि आत्म्याच्या उद्धारासाठी आणि परोपकारासाठी आपले जीवन समर्पित करत आहे.. जैन धर्मातील संयम आणि आत्मशुद्धीच्या मार्गावर पदार्पण करणाऱ्या भडगाव येथील २४ वर्षीय तेजस संजय कोचर आणि हिंगोणा येथील २५ वर्षीय महिमा प्रदीपकुमार बोरा हे दोन तरुण-तरुणींचा दीक्षा समारंभ बुलढाणा येथे अत्यंत श्रद्धायुक्त वातावरणात आज आणि उद्या होत आहे. स्थानकवासी जैन संप्रदायात प्रवेश घेणाऱ्या या दोघांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जैन समाजात उत्साहाचे वातावरण आहे..या दीक्षा महोत्सवाचा मुख्य समारंभ आज व उद्या जिजामाता स्टेडियम, बुलढाणा येथे होत आहे..याआधीच्या दिवसांमध्ये दीक्षार्थींनी सांसारिक जीवनातून संयमाच्या वाटेवर प्रवास सुरू करत असल्याचे दर्शन घडवणारे कार्यक्रम संपन्न झाले.. दरम्यान रक्षा सूत्र व संयम फेरे सोहळा पार पडले आहे.. ज्यात दीक्षार्थी दीक्षा सोहळ्यामुळे भाविकांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.. आजचा हा भव्य दीक्षा सोहळा पाहण्यासाठी हजारो लोकांची मोठी गर्दी झाली होती.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पैसे नाही, पण शक्तीपीठ मार्गासाठी सरकारला घाई, कारण... बच्चू कडूंचा सरकारवर निशाणा

**नांदेड** : राज्यात शक्तीपीठ महामार्गाचा शेतकऱ्यांकडून विरोध कायम आहे. दुसरीकडे सरकार मात्र, शक्तीपीठ महामार्गासाठी आग्रही दिसत आहे. यावरुन प्रहार संघटनेचे अध्यक्ष, माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर गंभीर आरोप करत कडाडून टीका केली आहे. शेतकऱ्यांचं ३० हजार कोटी रुपयाचं कर्जमाफ करायला सरकारकडे पैसे नाहीत. पण, शक्तीपीठ महामार्गासाठी सरकारला घाई दिसत आहे. त्यांच्यासाठी रस्ता महत्वाचा नाही. पण, राज्यकर्त्यांना शक्तीपिठाचा पैसा वेगळ्या मार्गाने किती येईल हे महत्वाचं असल्याची टीका बच्चू कडू यांनी केली.एका कार्यक्रमासाठी माजी आमदार बच्चू कडू आज नांदेडला आले होते. यावेळी त्यांनी ही टीका केली. शक्तीपिठाची मागणी नागरिकांची नाही. शक्तीपीठ मार्ग



निर्माण करताना कोणाचं पीठ कोण दळून खाणार आहे हे महत्वाचं आहे. त्यांचं पीठाकडे लक्ष आहे, शक्तीकडे नाहीये. पीठा मधील येणारा काही हिस्सा राज्यकर्त्यांच्या वाट्याला येईल हे खरं आहे, असं म्हणत बच्चू कडू यांनी सरकारवर निशाणा साधला.संतोष देशमुख हत्या प्रकरण राज्यभर गाजत आहे. त्यातच बीड जिल्ह्यात मारहाणीचे अनेक प्रकार समोर येत आहेत. लाऊडस्पीकरच्या आवाजावरून एका महिला वकिलाला मारहाण करण्यात आल्याची घटना बीडमध्ये घडली आहे. बीड जिल्ह्यात अशी अनेक प्रकरणं घडत आहेत. हे पाहता बीडमध्ये एखादा माजी सैनिक ब्रिगेडियर नेमला पाहिजे अशी प्रतिक्रिया माजी आमदार बच्चू कडू यांनी दिली.राज्य शासनातील अधिकारी बीडमधील प्रकरण मला वाटतं थांबवू शकेल. त्यामुळे सैन्य दलातील एखादा अधिकारी दिला, तर बीड तालावर येईल, असं देखील बच्चू कडू म्हणाले. यवतमाळमध्ये एका मुलीचा नदीत बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेवरुन बच्चू कडू यांनी नाराजी व्यक्त केली. देशात जाती धर्माच्या नावावर राजकारण होत असताना मोठी विषमता निर्माण झाली. एकीकडे अधिकारी आणि आमदारासाठी स्विमिंग टँक उपलब्ध आहेत. दुसरीकडे कपडे धुवायला सुध्दा घरात पाणी उपलब्ध होत नाही, असं दुर्दैव महाराष्ट्राच्या नशीबी असल्याचं ते म्हणाले. निलंबित पोलीस उपनिरीक्षक रंजित कासले यांनी अनेक गंभीर आरोप केले आहे. या आरोपाचा तपास केला पाहिजे गंभीर प्रकरण आहे. मराठवाड्यात नवीन इतिहास होऊ नये हीच अपेक्षा आहे. बीडमधून नवीनच काहीतरी ऐकायला येतं. गृहखात फडणवीस साहेबांकडे आहे, दूध का दूध पाणी व्हायला किती वेळ लागतो, नाहीतर आमच्याकडे दोन दिवस द्या सगळं बाहेर काढू, असं बच्चू कडू म्हणाले.आमदार-खासदार अधिकाऱ्यांची पोरं दहा-दहा भाषा शिकतात. गरीबाच्या पोराला शिकवण्यासाठी काय अडचण आहे. तो त्यांच्या विषय आहे पालकांचा त्यांनी शिकवायचं की नाही? भाषा शिकल्याने मराठी अस्मिता जाते असं काही नाही, नेहमी मराठी भाषा वापरली पाहिजे याच्याबद्दल दुमत नाही. पाट्या मराठीत लावल्या पाहिजे त्याच्याही बद्दल दुमत नाही, पण काय शिकावं हे राज ठाकरे कसं काय ठरवणार? शाळेत जर्मनी भाषा शिकली म्हणून त्याची वाह वाह होते, पण हिंदी शिकवते म्हणून त्यांच्यावर तुम्ही प्रश्न निर्माण करत असाल तर हे चुकीचं असल्याचं बच्चू कडू म्हणाले.

# धनंजय मुंडे यांच्याविरोधात न्यायालयीन लढा लढणार, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्याचा इशारा...

**पुणे** : बीडचे बडतर्फ पोलीस अधिकारी रणजित कासले यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएममध्ये छेडछाड करण्यात आल्याचा आरोप रणजित कासले यांनी केला. तसेच आपण धनंजय मुंडे यांचे पैसे पकडले होते, असा दावा कासले यांनी केला. विधानसभा निवडणुकीत आपण कोणतीही कारवाई करु नये, ईव्हीएमसोबत केल्या जाणाऱ्या गोष्टी गप्प राहून बघावे यासाठी आपल्या बँक खात्यात १० लाख रुपये पाठवण्यात आल्याचा आरोप रणजित कासले यांनी केला आहे. धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय वाल्मिक कराडच्या कंपनीच्या अकाउंटमधून आपल्या अकाउंटला पैसे पाठवण्यात आल्याचा आरोप कासले यांनी केला. त्यांच्या या आरोपांनंतर विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्याविरोधात निवडणूक लढवणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी आपण या प्रकरण हायकोर्टात जाणार असल्याचा इशारा दिला आहे. आम्ही काल पोलीस प्रशासनाचा खरा प्रताप पाहिला. मी राजेसाहेब देशमुख. मी परळी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार होतो. आम्ही पोलीस अधिकारी रणजित कासले यांचं स्टेटमेंट ऐकलं. त्यांनी सत्य बाहेर काढण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. या प्रकरणात विधानसभेची जी निवडणूक झाली, त्यामध्ये पोलीस खात्याने, महसूल खात्याने आणि सर्व प्रशासनाने काय-काय प्रताप केले, धनंजय मुंडेंना कुठल्या पद्धतीने मदत केली, हे रणजित कासले यांनी सांगितलं. त्यामोबदल्यात एकच माणूस बटण दाबणार असेल, त्याला बुथमध्ये कुठलाही त्रास होणार नाही याची पोलीस खात्याने खबरदारी घेतली. मयत लोकांचे मतदान करुन घेतले असतील, महसूल खातं, पोलीस प्रशासन यांचा कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली, असं राजेसाहेब देशमुख म्हणाले.बुथवर गोंधळ असेल, मारामारी असेल किंवा ईव्हीएम फोडण्याचा प्रताप असेल, संपूर्ण काळजीपूर्वक पोलीस प्रशासन धनंजय मुंडेंबरोबर कसं काम करत होतं हे रणजित कासले यांनी सांगितलं. त्यामुळेच सर्वसामान्य सोबत नसताना देखील चांगल्या मतांनी विजय होऊ शकतो. अशाप्रकारे तर पैकीच्या पैकी मते पडतील ना. कुठलाही प्रचार करायची गरज नाही. काही करायची गरज नाही. पैकीच्या पैकी मतं पडू शकतात ना. ही लोकशाहीमधील किमया आहे,




अशी टीका राजेसाहेब देशमुख यांनी केली.ईव्हीएमला छेडछाड करण्यासाठी एक रणजित कासलेला १० लाख दिले. मग एसपींना, ॲडीशनला, डीवायएसपींना किती दिले? मग पीआयला, सर्व पोलीस प्रशासनाला, महसूलला किती दिले? ही सर्व यंत्रणा बरबटलेली आहे. लोकशाहीला हाच खरा धोका आहे. दिवसेंदिवस महाराष्ट्रातील लोकशाही धोक्यात आलेली आहे. या धोक्यात आलेला लोकशाहीला एकच मार्ग राहिलेला आहे. या प्रकरणात दाद मागितली पाहिजे. म्हणून मी या प्रकरणात हायकोर्टात जाणार आहे, अशी भूमिका राजेसाहेब देशमुख यांनी मांडली आहे.

# शरीरात कॅन्सरचे सर्वात आधी दिसते हे गंभीर लक्षण, ५ वा बदल शेवटपर्यंत येत नाही लक्षात, वेळीच व्हा सावध...

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत अनेक आजार सिक्रेटली शरीरात वाढत असतात. काही आजारांमध्ये वेळेत निदान झालं तर उपचार सोपे होतात, पण काही आजार असे असतात की सुरुवातीला लक्षणं फारशी दिसत नाहीत आणि जेव्हा लक्षात येतं, तेव्हा उशीर झालेला असतो. कर्करोग (कॅन्सर) हा त्यापैकी एक अत्यंत धोकादायक आजार आहे. शरीराच्या कोणत्याही भागात पेशींची अनियंत्रित वाढ झाली, की कर्करोग होतो.ही वाढ सुरूवातीला दिसत नाही, पण काही संकेत आपल्याला मिळत असतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास पुढे जटिल समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे सुरुवातीची लक्षणं ओळखणं आणि वेळेत डॉक्टरांचा सल्ला घेणं अत्यंत गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊया शरीरात कर्करोग होण्याची सुरुवातीची ५ महत्त्वाची लक्षणं!



कॅन्सरचे शरीरात सर्वात आधी व पहिले दिसणारे लक्षण

### सतत थकवा आणि कमजोरी वाटणं

जर तुम्ही पुरेशी झोप घेत असताना, विश्रांती घेऊनसुद्धा थकवा जाणवत असेल, शरीरात ऊर्जा नसेल तर हे सामान्य थांबवून पाहण्यासारखं लक्षण नाही. कर्करोग झाल्यास शरीरातील पेशी अधिक ऊर्जा वापरतात, त्यामुळे शरिर थकलेलं वाटतं. यावर वेळेत लक्ष न दिल्यास शरीर झपाट्याने कमकुवत होतं.

### वजनात अचानक घसरण

जर कोणतीही डाएट किंवा व्यायाम न करता तुम्ही लक्षणीय प्रमाणात वजन कमी होतं असल्याचं लक्षात घेतलं असेल, तर ही गोष्ट गांभीर्याने घेणं आवश्यक आहे. पचनशक्तीवर परिणाम होणं, किंवा शरीरातील पेशींवर होणारा आक्रमण यामुळे वजन झपाट्याने कमी होऊ शकतं.

### त्वचेवर बदल दिसणं

त्वचेवर अचानक गाठी, डाग, जळजळ, किंवा तीव्र खाज येणं हे बदल कधी कधी कर्करोगाचं लक्षण असू शकतात. विशेषतः त्वचारोग टाळण्यासारखे वाटले तरी ते दीर्घकाळ टिकले तर त्वचेचा कर्करोग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.तोंडात, जिभेवर, घशात किंवा शरीराच्या कुठल्याही भागावर एखादी जखम सातत्याने होत असेल, किंवा ती भरत नसेल, तर त्याची तत्काळ तापसी करणे आवश्यक आहे. हे बदल शरीरात कर्करोगाच्या सुरूवातीच्या टप्प्याचं लक्षण दर्शवू शकतात.

### शौचातील अचानक बदल

शौच किंवा लघवी करताना खूप त्रास होणं, रक्त येणं, वारंवार संडास लागणं किंवा अचानक होणारे पचनाचे बदल हे कधी कधी पाचन संस्थेशी संबंधित कर्करोगाचं सुरुवातीचं लक्षण असू शकतं. त्यामुळे या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकतं.

# मुंबईने सामना जिंकला आणि रोहितने सर्वांची मनं जिंकली




**मुंबई :** सामना तर मुंबई इंडियन्सने जिंकला, पण यावेळी सर्वांची मनं रोहित शर्माने जिंकल्याचे पाहायला मिळाले. कारण या सामन्यात रोहित शर्माने एक अशी गोष्ट केली की, त्याचा व्हिडिओ जगभरात जोरदार व्हायरल व्हायला लागला आहे.

रोहित शर्माला या सामन्यात इम्पॅक्ट खेळाडू म्हणून खेळवण्यात आले होते, पण रोहित शर्माने झंझावाती सुरुवात करत आपला इम्पॅक्ट दाखवून दिला. खासकरून रोहित शर्माने या सामन्यात मोहम्मद शमीची गोलंदाजी चांगली फोडून काढली. रोहित शर्माने यावेळी १६ चेंडूंत तीन षटकारांच्या जोरावर २६ धावा केल्या. पण रोहित शर्माच्या या खेळीतील तिन्ही षटकार दर्जेदार होते. रोहित शर्माने दोन षटकं थोडी संथ सुरुवात केली खरी, पण तिसऱ्या षटकात मात्र त्याने सर्व कसर भरुन काढली. मोहम्मद हे षटक टाकत होता. या षटकाच्या पाचव्या चेंडूवर जी गोष्ट घडली ती कोणताही चाहता विसरू शकणार नाही. मोहम्मद शमी यावेळी वेगवान गोलंदाजी करत होता. त्यामुळे त्याचा सामना कसा करायचा, हा प्रश्न होताच. पण रोहित शर्माचे टायमिंग हे अफलातून असते, त्यामुळे त्याची फटकेबाजी पाहाविशी वाटते आणि तसेच यावेळीही घडले. रोहित शर्माच्या कंबरेच्या दिशेने मोहम्मद शमीचा चेंडू आला. या चेंडूला चांगलाच वेग होता. त्यामुळे रोहित शर्मा या चेंडूचा कसा सामना करणार, हे चाहत्यांना पाहायचे होते. पण रोहित शर्माच्या अचूक टायमिंगचा नुमना पुन्हा एकदा पाहायला मिळाला.

जसा चेंडू रोहित शर्माच्या जवळ आला तसा त्याने आपले पाय हलवले आणि चेंडू त्याने अप्रतिमपणे बॅटवर घेतला. टायमिंग भन्नाट होतं आणि त्याने हा चेंडू फ्लिक केला. त्यानंतर हा चेंडू थेट स्टेडियमच्या दुसऱ्या मजल्यावर चाहत्यांमध्ये जाऊन पडला. त्यामुळे रोहित शर्माच्या या एका फटक्याने सर्वांची मनं जिंकल्याचे पाहायला मिळाले. रोहितचा हा वानखेडेवरील १०० वा षटकार ठरला.रोहित शर्माने यावेळी दमदार फलंदाजी केली खरी, पण त्याला मोठी खेळी साकारण्याची संधी होती. कारण आव्हान कमी असल्यामुळे त्याला सेट होऊन मोठी खेळी साकारता आली असती. पण रोहित यावेळीही मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरला



# ठरलं तर मगला नव्या सीरियलमुळे फटका; पुन्हा बदलणार सायली-अर्जुनच्या मालिकेची वेळ

**मुंबई:** स्टार प्रवाहवर कोण होतीस तू काय झालीस तू ही मालिका येत्या २८ एप्रिलपासून सुरू होणार आहे. या मालिकेत अभिनेत्री गिरीजा प्रभू आणि अभिनेता मंदार जाधव ही जोडी मुख्य भूमिकेत दिसणार असून, यापूर्वी त्यांची याच वाहिनीवरील सुख म्हणजे नक्की काय असतं ही मालिका गाजली होती. आता २८ एप्रिलपासून ही जोडी पुन्हा एकदा दररोज रात्री ८ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेला रात्री ८ वाजताचा टाइम स्लॉट देण्यात आल्याने मालिकेच्या वेळेत बदल होणार एवढं नक्की.सध्या ठरलं तर मग आणि घरोघरी मातीच्या चुली या मालिकांचे एपिसोड ४५ मिनिटांचे असतात. आता नव्या मालिकेच्या एन्ट्रीमुळे हे चित्र बदलण्याची शक्यता आहे. कारण नव्या मालिकेची वेळी रात्री ८ वाजताची आहे, तर सध्या रात्री ८.१५ ते ९.०० या वेळेत ठरलं तर मग प्रसारित होते. आता सोशल मीडियावर अशी चर्चा आहे की, ठरलं तर मगची वेळ नव्या मालिकेच्या स्लॉटमुळे रात्री ८.३० वाजता करण्यात आली आहे. मालिकांविषयी अपडेट देणाऱ्या विविध सोशल मीडिया पेजवरुनही या बदलाविषयी पोस्ट शेअर करण्यात आली आहे.रम्यान ठरलं तर मगची केवळ वेळ बदलली जाईल की, त्यासोबतच ४५ मिनिटांऐवजी अर्ध्या तासाचा एपिसोड दाखवला जाईल हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. या दोन्ही मालिकांचा एपिसोड पाऊण तास दाखवण्याचा बदल १० फेब्रुवारी २०२५ पासून करण्यात आला होता. आता पुन्हा एकदा जुई गडकरी आणि अमित भानुशाली यांच्या मालिकेच्या वेळेत बदल केला जाणार आहे.

# ठाकरेंकडे ५५ हजारांची फौज तयार, आता मुंबईत लढाई आरपार...

# फिल्डींग लागली, तरीही अडचण का वाढली?

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीत जोरदार आपटी खाल्ल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे मुंबईत आरपारच्या लढाईसाठी सज्ज झाले आहेत. विधानसभेला महाविकास आघाडीची सत्ताधारी महायुतीसमोर अक्षरश: धूळधाण उडाली. महाविकास आघाडीला मिळून ५० चा आकडादेखील ओलांडता आला नाही. शिवसेना उबाठाला २० जागा मिळाल्या. यातील निम्म्या जागा त्यांनी मुंबईत जिंकल्या. आता ठाकरेंना पुन्हा एकदा मुंबईत वर्चस्व सिद्ध करावं लागणार आहे. मुंबई महापालिकेवर गेल्या तीन दशकांपासून शिवसेनेची सत्ता आहे. २०१७ मध्ये भाजपनं शिवसेनेला थेट अंगावर घेतलं. पण अटीतटीच्या लढतीत शिवसेनेनं भाजपपेक्षा २ जागा जास्त जिंकल्या आणि सत्ता स्थापन केली. आता शिवसेनेतील फुटीनंतर भाजपला मुंबई महापालिकेची सत्ता काबीज करायची आहे. ठाकरेंची कमी झालेली ताकद आणि शिंदेसेनेचं मुंबईतील मर्यादित वर्चस्व यांचा फायदा घेत मुंबई महापालिकेत पहिल्यांदाच भाजपचा महापौर बसवण्याची संधी सत्ताधारी पक्षाकडे आहे. दुसरीकडे विधानसभेतील पराभवानंतर उद्धव ठाकरेंनी सगळं लक्ष मुंबई महापालिकेवर केंद्रीत केलं आहे. मुंबई महापालिकेत यश मिळाल्यास ठाकरेंच्या राजकारणाला संजीवनी मिळू शकेल. ठाकरेंनी मुंबईसाठी स्वतंत्र निरीक्षक नेमून त्यांच्याकडून वारंवार परिस्थितीचा आढावा घेतला आहे. तळागाळातला शिवसैनिक, गटप्रमुख, शाखेत नियमित येणारा शिवसैनिक, अनेक शाखाप्रमुख आजही ठाकरेंसोबत असल्याचं ठाकरेंच्या लक्षात आलेलं आहे. शाखा नेटवर्क हीच ठाकरेंची मुंबईतील खरी ताकद आहे. पक्षातील बंडांनंतरही ती शाबूत आहे. त्यामुळेच ठाकरेसेनेला विधानसभा निवडणुकीत १० उमेदवार निवडून आणता आले.तळागाळातील शिवसैनिक, गटप्रमुख, शाखाप्रमुख, शाखासंघटक यांची तगडी फळी ठाकरेंकडे आहे. तब्बल ५५ हजार जणांचा नोंदणीकृत वर्ग आजही ठाकरेंसोबत आहे. ६ स्वतंत्र निरीक्षकांनी घेतलेल्या आकडेवारीतून ही माहिती समोर आलेली आहे. याच शिवसैनिकांच्या




आणि पदाधिकाऱ्यांच्या जोरावर मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी ठाकरे करत आहेत. मुंबई महापालिकेची निवडणूक काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीशिवाय, कोणतीही आघाडी न करता लढण्याची ठाकरेंची तयारी आहे.एकीकडे मुंबईतील तळागाळातील शिवसैनिक आणि पदाधिकारी ठाकरेंसोबत असताना दुसरीकडे मधल्या फळीतील नेत्यांना आत्मविश्वास वाटत नाही. हीच ठाकरेंसाठी महत्त्वाची अडचण आहे. मधल्या फळीतील नेते ठामपणे उभे राहताना दिसत नाही. नेतृत्व आणि शेवटचा कार्यकर्ता स्वबळावर आरपारची लढाई करण्यासाठी सज्ज असताना मधल्या फळीतील नेत्यांना नसलेला आत्मविश्वास हीच ठाकरेंची समस्या आहे.

# पुण्यात भाजप विरुध्द काँग्रेस यांच्यात राडा, भाजप युवा मोर्चाचा काँग्रेस कार्यालयावर मोर्चा...

**पुणे :** पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे. पुण्यात काँग्रेस आणि भाजपचे कार्यकर्ते आमनेसामने येतील की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. नॅशनल हेराल्ड आरोप प्रकरणावरुन भाजप युवा मोर्चाकडून पुण्यातील काँग्रेस भवनच्या समोर जावून आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार भाजपचे कार्यकर्ते काँग्रेस भवन जवळ दाखल झाले आहेत. पुण्यातील बालगंधर्व चौक येथे भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले आहेत. कार्यकर्त्यांकडून काँग्रेस भवनमध्ये जाण्याचा प्रयत्न केला जातोय. तर दुसरीकडे काँग्रेसचे कार्यकर्तेदेखील आक्रमक झाले आहेत. भाजप युवा मोर्चाने दिलेल्या इशाऱ्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते देखील काँग्रेस कार्यालयात दाखल झाले आहेत. काँग्रेस कार्यकर्त्यांकडे लाठ्या-काठ्या आहेत. भाजपचे कार्यकर्ते आले तर त्यांना जशास तसं उत्तर देऊ, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलीस सध्या परिस्थिती हाताळत आहेत. पोलिसांकडून दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला जातोय. भाजप कार्यकर्त्यांनी याआधीदेखील काँग्रेस कार्यालयावर जावून आंदोलन केलं आहे. अशाप्रकारच्या आंदोलनातून काँग्रेस कार्यालयात तोडफोडीची देखील घटना याधी घडली आहे. त्यामुळे यावेळी भाजप युवा मोर्चाकडून इशारा मिळाल्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते देखील भाजपचा सामना करण्यासाठी सज्ज झालेले बघायला मिळाले. काँग्रेस कार्यकर्ते लाठ्या-काठ्या घेऊन सज्ज राहिले. आंदोलकांना जशासं तसं उत्तर देऊ असं काँग्रेस कार्यकर्त्यांनी म्हटलं. त्यामुळे परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली.भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयाच्या दिशेला निघाले. ते मोर्चा घेऊन बालगंधर्व चौक येथे आले.

यावेळी पोलिसांनी आंदोलकांना अडवण्याचा प्रयत्न केला. पण आंदोलक ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. आंदोलकांनी हातात पोस्टर आणले होते. तसेच त्यांनी राहुल गांधी यांचा सोबत आणलेलं पोस्टर फाडलं. याशिवाय राहुल गांधी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. काँग्रेसने नॅशनल हेराल्ड प्रकरणाबाबत जनतेला चुकीची माहिती देणं बंद करावं, अशी भूमिका यावेळी आंदोलकांनी मांडली. आंदोलकांकडून यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.पोलिसांनी या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बालगंधर्व चौक




परिसरात बॅरिकेट्स लावले होते. यावेळी काही आंदोलक एवढे आक्रमक झाले की, ते पोलिसांना न जुमानता बॅरिकेट्स बाजूला करुन पुढे जाऊ लागले. पण पोलिसांनी तातडीने त्यांना रोखलं. पोलिसांनी आंदोलकांना कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन भाजपच्या आंदोलकांना केलं. यानंतर आंदोलकांनी बालगंधर्व चौकात बसून निषेध व्यक्त करण्याची भूमिका घेतली. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून आपण इथेच बसून आंदोलन करत असल्याचं भाजप युवा मोर्चाच्या आंदोलकांनी जाहीर केलं. यामुळे मोठा अनर्थ टळला.

# रोहित पवार यांच्या मतदारसंघात राजकारण, शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांकडून अजित पवारांचे स्वागत

**अहिल्यानगर :** उपमुख्यमंत्री अजित पवार आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या कर्जत-जामखेड मतदारसंघाच्या दौऱ्यावर आहेत. अजित पवार यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर कर्जत जामखेडमध्ये फक्त राष्ट्रवादीतच नव्हे, तर रोहित पवार यांच्या कार्यकर्त्यांमध्ये देखील उत्साहाचं वातावरण बघायला मिळालं. अजित पवार यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर रोहित पवारांच्या समर्थकांनी अजित पवार यांच्या स्वागताचे बॅनल लावले होते. तसेच अजित पवार कर्जत जामखेडमध्ये दाखल होताच रोहित पवारांच्या समर्थकांनी अजित पवार यांचं स्वागत केलं. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.रोहित पवार हे गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पक्षात नाराज असल्याची चर्चा आहे. विधानसभा निवडणुकीवेळी रोहित पवार हे चांगलेच आक्रमक झालेले बघायला मिळाले होते. पण निवडणुकीनंतर गेल्या काही दिवसांपासून रोहित पवार यांच्या नाराजीच्या चर्चा सातत्याने समोर येत आहेत. रोहित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संघटनेत अपेक्षित पद न मिळाल्यामुळे ते नाराज असल्याची चर्चा आहे. त्यांनी या चर्चांचं खंडन केलं होतं. पण यानंतर आज त्यांच्या कार्यकर्त्यांकडून अजित पवार यांचं स्वागत करण्यात आलं आहे. यानंतर रोहित पवार यांनी माध्यमांसमोर येत प्रतिक्रया दिली आहे.नगराध्यक्ष माळी समाजाचे आहेत. ते माझ्यासोबत आहेत. ते भाजप आमदार राम शिंदे यांना आवडत नाहीत. एक नगरपंचायत तुमच्याकडे यावी यासाठी राजकारण केलं जात आहे. माझा आवाज दाबण्यासाठी राम शिंदे यांना विधान परिषदेचे आमदार केलं. त्यानंतर सभापती केलं. स्वागताला गेलेले कार्यकर्त्यांच्या हातात एक पत्र आहे, त्यामध्ये महाविकास आघाडी सरकारच्या काळात जो निधी मंजूर करण्यात आला होता त्याची मागणी करण्याबाबत, तसेच मतदारसंघातील प्रश्न आहेत ते




उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या लक्षात आणून देण्यासाठी कार्यकर्ते भेटल आहेत, असं रोहित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. ज्यांनी हे बॅनर्स लावले आहेत त्यांना आता शोधत आहोत. काही लोकांना सामाजिक काम नसल्यामुळे त्यांनी असे बॅनर्स लावले आहेत. अजित पवार तिकडे आले आहेत त्याचा आनंद आहे, ते माझे काका देखील आहेत, अशी प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली.

# मंत्री अतुल सावे यांना झटका, मुख्यमंत्र्यांकडून मंजूर कामांना स्थगिती

**नांदेड :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री अतुल सावे यांना मोठा धक्का दिला आहे. मंत्री अतुल सावे यांनी मंजूर केलेल्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. भाजप आमदार तुषार राठोड यांनी अतुल सावे यांची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे केले होती. त्यांच्या तक्रारीची दखल मुख्यमंत्र्यांनी घेतली. आमदार तुषार राठोड यांच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री अतुल सावे यांनी मंजूर केलेल्या कामांना स्थगिती दिली आहे. अतुल सावे यांनी नांदेड जिल्ह्यातील कामांना मंजुरी दिली. पण आमदार तुषार राठोड यांच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडच्या तांडा वस्तीच्या ७ कोटी २५ लाखांच्या कामांना स्थगिती दिली आहे. आम्हाला विश्वासात न घेता अतुल सावे यांनी तांडा वस्तीच्या कामांना मंजुरी दिल्याची तक्रार तुषार राठोड यांनी केली होती. यानंतर मुख्यमंत्र्यांनी ही कारवाई केली आहे. मुख्यमंत्र्यांचा हा निर्णय म्हणजे अतुल सावे यांच्यासाठी धक्का मानला जातोय.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या




नेतृत्वातील सरकार स्थापन होऊन आतापर्यंत चार महिने झाले आहेत. या चार महिन्यात अनेक घडामोडी घडून आल्या आहेत. सुरुवातीला बहुमत मिळूनही मुख्यमंत्रीपदाचा तिढा सुटत नसल्याने सरकार स्थापन होण्यास विलंब झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्रीपदावर दावा होता. पण भाजपदेखील मुख्यमंत्रीपदासाठी आग्रही असल्याने अखेर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडावा लागला.यानंतर जागावाटपावरुन महायुतीत रस्सीखेच बघायला मिळाली. एकनाथ शिंदे यांना गृह खातं हवं होतं. पण ते खातं देखील भाजपच्या वाटेला गेलं. यानंतर पालकमंत्रीपदावरुन रस्सीखेच बघायला मिळाली. नाशिक आणि रायगड जिल्ह्यांचे पालकमंत्री अद्याप ठरलेले नाहीत. त्यामुळे महायुतीत सातत्याने नाराजी असल्याच्या किंवा मतभेद असल्याचे वृत सातत्याने समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी मंजूर केलेल्या आरोग्य विभागातील ३२०० कोटींच्या कामांना देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिल्याची माहिती समोर आली होती. यानंतर आता अतुल सावे यांनी मंजूर केलेल्या कामांना मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याची माहिती समोर येत आहे.

# गडकिल्ल्यांची स्वच्छता-संवर्धन, जयंत पाटील यांची धर्मवीरगडावर मोहीम, व्लॉगमधून इतिहास मांडला

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील एका वेगळ्या माध्यमातून जनतेसमोर आले आहेत. गडकिल्ल्यांची स्वच्छता, संवर्धन मोहीम घरोघरी पोहोचावी, यासाठी जयंत पाटील यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातील धर्मवीरगडावर व्लॉग केला आहे. जयंत पाटील यांच्या टेक्नोसॅव्ही, ट्रेंड फॉलो करणाऱ्या सवयीची कल्पना समर्थकांना आहेच. तंत्रज्ञानाची चांगली माहिती असल्याने त्यांना नुकतेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ब्रूफ समितीचे अध्यक्षपद देण्यात आले आहे. मात्र यावेळी जयंत पाटलांनी टेक्नॉलॉजीचा वापर एका आगळ्यावेगळ्या कारणासाठी केलाय.




गडकिल्ल्यांची स्वच्छता, संवर्धन मोहीम घरोघरी पोहोचावी, यासाठी त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातील धर्मवीरगडावर ट्रेंडमध्ये असलेला व्लॉग तयार केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी राज्यातील गडकिल्ल्यांची स्वच्छता आणि संवर्धनाची मोहीम हाती घेतली आहे.

दिनांक १३ एप्रिल रोजी लंकेंनी ही मोहीम अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव किल्ल्यावर म्हणजेच धर्मवीरगडावर घेतली. या मोहिमेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सहभागी झाले होते व त्यांनी या ठिकाणी आपला व्लॉग शूट केला. जयंत पाटील यांनी आपल्या व्लॉगमध्ये गडकिल्ले स्वच्छता आणि संवर्धन मोहीम समजवून सांगतानाच धर्मवीरगडाचा इतिहासही मांडला.दरम्यान, सोशल मीडियाच्या युगात व्लॉग हा सर्वात प्रभावी व ट्रेंडींग माध्यम आहे. राज्यात पहिल्यांदाच एका राजकीय नेत्याने असा आगळावेगळा प्रयोग करून सामान्य माणसांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे.

# बोगस बियाणे वापरल्यास होणार कारावास....

**जनसंचलन/ खामगाव**

बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या घटना तालुक्यात समोर आल्या आहेत. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ नुसार, बोगस बियाण्यांचा वापर, विक्री आणि साठवणूक हे कायद्याने गुन्हा मानले गेले आहे. या गुन्ह्यात दोषी आढळलेल्या व्यक्तींना पाच वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांचा दंड होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी बोगस बियाण्यांपासून सावध राहण्याची गरज आहे, तसेच पक्क्या बिलाशिवाय कोणतीही नुकसानभरपाई मिळवता येत नसल्याने शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना पक्के बील घेणे आवश्यक आहे. खरिप हंगाम दीड महिन्यांवर असल्याने शेतकरी सध्या तयारीला लागले आहेत. अशा परिस्थितीत बियाणे कंपन्यांकडून शेतकऱ्यांपर्यंत बिझी-बियाणे आणि कीटकनाशकांचा पुरवठा सुरू केला जात आहे. हंगामाच्या दरम्यान बीजी-३, आर.आर. बीटी, एचटीबीटी आणि बिडगार्ड या नावांच्या अनधिकृत कापूस बियाण्यांची विक्री होण्याची शक्यता आहे. हे बियाणे जमीन, पर्यावरण आणि आरोग्यास हानिकारक ठरू शकतात

# रोहयोच्या कामांवर ९५ कोटींचा खर्च

**जनसंचलन/बुलढाणा**

२०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (रोहयो) करण्यात आलेल्या कामांवर ९५ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. यामध्ये सर्वाधिक खर्च अकुशल मजुरांच्या मजुरीवर करण्यात आला आहे. अकुशल कामांसाठी ७९ कोटी ६ लाख, तर कुशल कामांसाठी १२ कोटी १ लाख रुपयांचा खर्च झाला आहे. याशिवाय प्रशासकीय कामकाजासाठी ३ कोटी ४१ लाख रुपये खर्च केल्याची नोंद आहे. गेल्या तीन आर्थिक वर्षांचा विचार केला असता, २०२३-२४ मध्ये सर्वाधिक खर्च झाल्याचे दिसून येते.

# चुकीचे गतिरोधक; अपघाताचा धोका!

**जनसंचलन/ खामगाव**

शहरातील विविध भागांमध्ये चुकीच्या पद्धतीने व नियमबाह्य उभारण्यात आलेले गतिरोधक (स्पीड ब्रेकर) वाहनधारकांसाठी डोकेदुखी ठरत असून, यामुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या काही महिन्यांत शहरातील मुख्य रस्त्यांपासून गल्लीबोळांपर्यंत अनेक ठिकाणी वेगवेगळ्या उंचीचे व आकाराचे गतिरोधक बनविण्यात आले आहेत. यापैकी बहुतांश गतिरोधक ना कोणत्याही मान्यतेनुसार बांधले गेले आहेत, ना त्यावर पांढऱ्या पट्ट्यांचे योग्य मार्किंग करण्यात आले आहे. परिणामी, विशेषतः रात्रीच्या वेळी व पावसाळ्यात या गतिरोधकांचे अचूक भान न राहता ताबा सुटून अपघात होतात

# राजकीय तणावातून शेतकऱ्याची आत्महत्यागुन्हा दाखल, दोन आरोपी फरार!

**जनसंचलन/ खामगाव**

रोहणा येथील शेतकरी संतोष रामदास गव्हाळे (वय ४४) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १७ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७:३० वाजता उघडकीस आली. संतोष गव्हाळे हे गावाच्या विद्यमान सरपंचाचे पती होते. त्यांनी राजकीय तणावामुळे आत्महत्या केल्याचा आरोप पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघेही आरोपी सध्या फरार आहेत. या प्रकरणी गोपाल गव्हाळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संतोष गव्हाळे यांच्यावर वारंवार खोटे आरोप करण्यात येत होते. तसेच त्यांना शिवीगाळ व धमक्या दिल्या जात होत्या. या त्रासामुळे ते मानसिक तणावात होते. त्यांचा हेतु पुरस्सर छळ करण्यात येत असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीवरून ग्रामीण पोलिस ठाण्यात तुकाराम चंद्रभान डांगे आणि अविनाश नारायण महाले यांच्या विरोधात भारतीय दंड विधानातील बीएनएस कलम १०८,



३५२, ३५१ (२), ३५१ (३) व ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक रवी मुंडे करत आहेत. दरम्यान, दोन्ही आरोपी अद्याप फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे

# अघोषित भारनियमनामुळे ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त

**जनसंचलन/ नांदुरा**


तालुक्यातील ग्रामीण भागात अलीकडील काळात अघोषित भारनियमनात मोठी वाढ झाली आहे. परिणामी, नागरिकांना तीव्र उन्हाळ्यात प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, संताप व्यक्त केला जात आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उकाड्यामुळे सर्वसामान्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामध्ये लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना विशेषतः त्रास होत आहे. पंखे, कूलर यांसारख्या साधनांची उपलब्धता असूनही सततच्या वीज खंडितमुळे त्यांचा उपयोग करणे अशक्य झाले आहे

# मादणी येथे चोरीचा प्रयत्न श्वानामुळे झाला अयशस्वी !

## ग्रामस्थांची सतर्कता चोरटे सीसी कॅमेऱ्यात कैद...

**जनसंचलन/ डोणगाव**

मादणी येथे १६ एप्रिलच्या मध्यरात्री पांढऱ्या रंगाच्या वाहनातून आलेल्या पाच चोरट्यांनी गावात घुसून चोरी करण्याचा प्रयत्न केला; मात्र, श्वानाच्या भुंकण्यामुळे आणि ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला. चोरट्यांना गावातून पलायन करावे लागले. चोरटे तोंडाला रुमाल बांधून, हातात काठ्या घेऊन पांढऱ्या रंगाच्या वाहनातून मादणी गावात आले. त्यांनी काही घरांमध्ये डोकावून पाहण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी नाना मेटांगळे यांच्या कुत्र्याच्या भुंकण्यामुळे त्यांची झोपमोड झाली. परिस्थिती संशयास्पद वाटल्याने त्यांनी शेजारच्या नागरिकांना तत्काळ फोन करून माहिती दिली. यानंतर चोरट्यांनी बबनराव मणीरामजी बाजड यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील पलंग व इतर साहित्य अस्ताव्यस्त केले. मात्र, त्यांना काहीही मिळाले नाही. दरम्यान, ग्रामस्थ जागे झाल्याचे लक्षात येताच चोरटे घटनास्थळावरून पळून गेले. त्यानंतर ग्रामस्थांनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र चोरटे सापडले नाहीत. घटनेची माहिती मिळताच डोणगाव पोलिस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ मादणी येथे पोहोचले. त्यांनी परिसरातील सीसी कॅमेरा फुटेजची पाहणी केली असता, चोरटे तोंडावर रुमाल बांधून असल्याचे स्पष्ट दिसून आले. तसेच, त्यांच्या हातात बॅटरी व काठ्याही असल्याचे आढळले.



# मंठा तालुक्यातील तळणी परिसरात वाळूची सुसाट वाहतूक !

जनसंचलन/ तळणी

मंठा तालुक्यातील पूर्णा नदीकाठच्या तब्बल १० वाळू पट्ट्यातून लिलावापुर्वी नियमबाह्य वाळूचे बेसुमार उत्खनन सुरु आहे. विशेष म्हणजे , तहसीलदारांनी पथकांची नियुक्ती केली खरी पण , स्थानिक वाळूचोर पथकाला हुलकावणी देऊनही अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीचा सपाटा सुरू आहे. मंठा तालुक्यातील पुर्णा नदीकाठच्या खोरवड , देवठाणा , उस्वद , हनवतखेडा , कानडी , टाकळखोपा , वाघाळा , किर्लाक्ष, पोखरी केंधळे , भुवन-वझर सरकटे या गांवच्या हद्दीतून ऑक्टोंबर २०२४ ते एप्रिल २०२५ पर्यंत अंदाजे २५ हजार ब्रास वाळू उत्खनन करून ६ ते ७ हजारांत जागेवर टिप्पर भरुन विक्रीचा गोरखधंदा राजरोसपणे सुरू असल्याचा आरोप आहे. पुर्णा नदीकाठच्या गावांत वाळू विक्रीतून दररोज लाखांची कमाई सुरू असल्याचे सांगितल्या जात आहे. या पुर्णा नदीकाठच्या अवैध वाळू विक्रीला मंठा महसूल व पोलीसांसोबत आरटीओचे अर्थपूर्ण सहकार्य असल्याच्या तक्रारी वाढल्याचाही आरोप आहे. तब्बल १५० टिप्पर मधून वाळू वाहतूक चालते? हे यंत्रणेला दिसत नाही काय?असाही प्रश्न उपस्थित होत आहे. पुर्णा नदीकाठच्या टाकळखोपा , वाघाळा , किर्ला, उस्वद ,देवठाणा, कानडी , हनवतखेडा , पोखरी केंधळे व भुवन ही गावे अवैध वाळू उत्खनन व विक्रीची केंद्र बनली आहे. डझनभर जेसीबी , ५० ते ७० ट्रॅक्टर व दीडशे टिप्पर मधून बुलढाणा , वाशिम , हिगोली, परभणी व जालना जिल्ह्यातील लोणार - मेहकर , रिसोड, सेनगाव , जिंतुर , मंठा व सेवली भागातील बांधकामांना चढ्या दराने वाळूची विक्री सुरू आहे. या मार्गांवर वाळू वाहतूक चालते! टाकळखोपा -वाघाळा येथील टिप्पर इंचा - शिरपूर पांदण मार्ग पोलीस चौकीचा पाठीमागून खडी मशीन वरुन लोणार कडे , उस्वद - देवठाणा - कानडी येथील टिप्पर देवठाणा- बन मार्गे लोणार , लोणी मार्ग रिसोड , कापडसिंगी मार्ग सेनगाव कडे , किर्ला व हनवतखेडा येथील टिप्पर गारटेकी मार्गे मंठा कडे , पोखरी केंधळे व भुवन येथून वझर सरकटे मार्ग बैलोरा चौफुली- सेवली व वाटुर कडे वाळू वाहतूक करतात. कारवाई न करण्यासाठी लाखोचा हप्ता ? पुर्णा नदीकाठच्या १५ गावांतील जेसीबी , ट्रॅक्टर टिप्पर धारकांकडून कारवाई न करण्यासाठी महिन्याला लाखोंचा हप्ता वसुल केला जातो. हप्ते न देणाऱ्या वाहनांवर ठरवून कारवाई केली जात असल्याचा आरोप उबाठाचे तालुका उपप्रमुख ज्ञानेश्वर सरकटे , पुर्णा नदी बचाव समितीचे अध्यक्ष रामदास कांगणे , उस्वदचे माजी सरपंच राम चट्टे , कानडीचे माजी सरपंच केशव खंदारे , किर्लाचे आशिष चव्हाण यांनी केला आहे.



दिवसभर तलाठी गस्तीवर ... उस्वद-देवठाणा सज्जाचे तलाठी नितीन चिंचोले यांना विचारले असता , उस्वद - देवठाणा भागात दिवसभर गस्तीवर असल्याचे सांगितले. मंडळ अधिकारी सुट्टीवर ... तळणी मंडळ अधिकारी अनिल उफाड यांना विचारले असता , मुलाच्या विवाह सोहळ्यानिमित्ताने सुट्टीवर असल्याचे सांगितले.

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलढाणा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी.

जनसंचलन/बुलढाणा

द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशन द्वारा संचालित, राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय बुलडाणा येथे द्वारका फाउंडेशनचे अध्यक्ष श्री धृपतरावजी सावळे साहेब व सचिव सौ. कीर्तिताई समीर पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली दि . १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वि जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.बी.व्ही.नरवाडे उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. पी.एस.काटकर, व इतर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रा.पी.ए.राणे यांनी याप्रसंगी प्रास्ताविक सादर केले त्यात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच न्याय, समता आणि बंधुतेचा अनोखा संगम! त्यांच्या विचारांनी लाखो लोकांचे जीवन उजळवले, अन्यायाविरुद्ध लढण्याचं बळ दिलं. भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांनी केवळ कायदे बनवले नाहीत, तर प्रत्येक वंचित घटकाला आपलं हक्काचं स्थान दिलं असं सांगितले. या प्रसंगी प्रा. बी.व्ही. नरवाडे यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन संघर्षाचा आढावा घेत त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यावर विचार मांडले. तसेच प्रा. पी.एस.काटकर यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल माहिती दिली. डॉ.बाबासाहेबांनी गोरगरिबांची स्थिती सुधारण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. समाजातील अस्पृश्यतेसह अनेक प्रथा नष्ट करण्यात त्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. आपले संपूर्ण जीवन दिनदलितांच्या उत्कर्षासाठी घालवले तसेच त्यांनी तळागाळातील सर्व सामान्य माणूस सर्व शक्तिनिशी जागा केला. त्यांना आत्मसन्मान, स्वाभिमाना, अस्मिता व आपल्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. व संपूर्ण पीडित मानव जातीला गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे अधिकार दिले. न्याय, ङ्गस्वातंत्र्य, ङ्गसमताफ आणि बंधुता ही मूल्ये ङ्गप्रजासत्ताक भारताची ङ्गमहामूल्ये या महामानवाने भारताला दिली. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख, प्रा. कुहिरे, प्रा. देशपांडे , प्रा. राम मोळे, प्रा. ऋषी भालेराव ,प्रा. इंगळे, प्रा.लाहोटी , श्री. विशाल शिंदे , सौ. सरकटे, श्री गवई, श्री. योगेश काकडे, श्री. खोलगडे, श्री, पवार तसेच आदी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी या अभिवादन कार्यक्रमासाठी उपस्थित श्री शिवाजी सायन्स अँड आर्ट कॉलेज चिखली(३०८)होते.








# नखं गळतीवर नुसतीच मलमपट्टी?

## केंद्रीय आयुष मंत्र्यांनी शोधावा रामबाण उपाय!

जनसंचलन/बुलढाणा



Nail Fall Daily Sheet Taluka Shegaon upto 17/04/2025

| अ.क्र. | PHC | Village | Poulation | Total House No | Nail Fall Daily Report | Total No of Hair Fall Patient |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Bhongaon | Bondgaon | 539 | 92 | 7 | 7 |
| २ | | Kalwad | 510 | 107 | 13 | 13 |
| ३ | | Kathora | 1230 | 260 | 10 | 10 |
| ४ | | Machindrakhed | 870 | 210 | 7 | 7 |
| Total | | | 3149 | 669 | 37 | 37 |

केस गळती प्रकरणाची राज्यात चर्चा झाली मात्र खरे कारण कळले नसून,आता टक्कल पडल्यावर पायांच्या बोटांची नखं गळत असल्याने शेगाव तालुक्यातील चार गावात भीतीयुक्त वातावरण पसरले आहे. एकूण ३७ रुग्ण आढळले असून,यावर आता उपायोजना आवश्यक आहे. मात्र या गंभीर बाबीकडे केंद्रीय आयुष मंत्री तथा खासदार प्रतापराव जाधव यांनी लक्ष वेधावे, अशी मागणी जोर धरत आहे. केस गळती प्रकरण राज्यात गाजले. केस गळती झालेल्या रुग्णांची आता नखं गळती सुरु झाल्याच्या तक्रारी पुढे आल्यात. केस गळती झालेल्या रुग्णांची नखं कमजोर होऊन विद्रूप झालेली नखं गळून पडत आहे. या नखं गळती प्रकरणाने परिसरात भीतीयुक्त वातावरण दिसून येत आहे. डिसेंबर महिन्यापासून बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, नांदुरा, खामगाव तालुक्यातील अनेक गावात अचानक केस गळतीने नागरिक हैराण झाले होते. आता केस गळती झालेल्या रुग्णांची नखे अचानक विद्रूप होऊन नखे कमजोर होऊ लागलीत तर अनेकांची नखे गळून पडली. बोंडगाव येथे ७,कालवड येथे १३, काठोरा १० आणि मच्छिंद्र खेड ७ असे ३७ नखं गळतीने बाधीत रुग्ण उपचार घेत आहेत. परंतू हा अनामिक आजार कशामुळे होत आहे? हा प्रश्न अनुत्तरीत असून,शासन व प्रशासनाने हा प्रश्न तात्काळ सोडविण्याची गरज निर्माणझालीआहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958